REGISTERED No. B. 3434

अर्थ

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार,
इत्यादि विषयांस वाहिलेलें साप्ताहिक.
प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.

*वर्गणीचे दर :*
वार्षिक : ६ रु. सहामाही : ३ रु.
किरकोळ अंक : ४ आ.

*जाहिरातीचे दर :*
कराराच्या व इतर अटी जाहिरातखात्याकडून मागवाव्यात.
चेक, मनिऑर्डरी, इ. पाठविण्याचा पत्ता:–
" अर्थ "
" *दुर्गाधिवास* " पुणें ४.

# अर्थ

वर्ष १५ पुणें, बुधवार तारीख २४ आगस्ट, १९४९ अंक ३४


# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट

## लि., पुणें २.

मेसर्स स्कोडा लि. यांच्याकडून विकत घेतलेल्या साखरेच्या नवीन सेमि–अिलेक्ट्रिक मशिनरीपैकी

★ **सोळा लक्ष** रुपयांची मशिनरी ता. २।८।४९ पूर्वी मुंबईस उतरून फॅक्टरीवर येऊन पोहोंचली आहे.

★ **तीन लक्ष** रुपयांची माशिनरी निघाली असून मुंबईस सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यांत येईल. राहिलेली

★ **पांच लक्ष** रुपयांची माशिनरी १९४९ च्या सप्टेंबरच्या शेवटच्या आठवड्यांत निघेल.

**नवीन मशिनरीनें एक हजार ते बाराशे पोतीं साखर दररोज तयार होईल.**

**सरकारी नियमाप्रमाणें सिंडिकेटचे शेअर कंपनीचे भागीदार व त्यांचे मित्र यांनाच विकत घेतां येतात.**

येत्या हंगामाची साखर १९४९ च्या नवंबर-डिसेंबरमध्यें तयार होऊन
साखर-विक्री सुरू होईल.

## मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातील.

मुदत एक वर्ष द. द. शेकडा ५ टक्के व्याज
मुदत दोन वर्षें द. द. शेकडा ५॥ टक्के व्याज
मुदत तीन वर्षें द. द. शेकडा ६ टक्के व्याज

**व्याज दर सहा महिन्यांनीं दिलें जाईल.**

चंद्रशेखर गोविंद आगाशे,
बी. ए., एलएल. बी.,

**सी. जी. आगाशे आणि कंपनी,**
मॅनेजिंग एजण्टस.

कॉमनवेल्थ बिल्डिंग,
लक्ष्मी रोड, ९८०, सदाशिव,
पुणें २.

तारीख ६ आगस्ट १९४९

## सोसायट्यांस विनंति

किर्लोस्कर कंपनी सोसायट्यांना ज्या भावांत माल देते त्याच भावांत आम्हीहि नांगर वगैरे माल पुरवितों. आपली कोणतीहि ऑर्डर आपण आमचे मार्फत पाठविण्यानें तोटा नसून फायदाच आहे. सर्व तऱ्हेची सोसायट्यांना लागणारी माहिती व इतरहि माल आम्ही पुरवितों.

या वर्षीची ऑर्डर आमचे मार्फतच पाठवा.

केळकर बंधु, पुणें व नाशिक.

## विविध माहिती

**कपन्यांना भरावा लागणारा प्राप्तीवरील कर**—ज्या उद्योग-धंद्यांतून कामाच्या तीन पाळ्या चालतात, त्यांना घसारा-फंड काढण्याच्या बाबतींत सवलत देण्याच्या हेतूनें हिंदुस्थान सरकारनें प्राप्तीवरील कराच्या नियमांत दुरुस्ती करण्याचें ठरविलें आहे. ह्या सवलतीच्या नियमांचा फायदा पोलादाच्या धंद्याला सर्वांत अधिक होणार आहे. कारण पोलादाच्या कारखान्यांतील भट्ट्या तीन पाळ्यांनें नेहमींच काम करीत असतात. टाटा आयर्न अँड स्टील कंपनी वरील सवलतीमुळें करांत १५ लाख रुपये वांचवूं शकेल असा अंदाज करण्यांत आला आहे

**जपानला अमेरिकेची अमोल मदत**—जपानच्या सरकारनें आर्थिक मदतीसंबंधानें ६०,००० शब्दांची एक पुस्तिका प्रसिद्ध केली आहे. अमेरिकेची मदत नसती तर जपान आर्थिक दृष्ट्या कोसळला असता आणि लक्षावधि लोक भुकेकंगाल झाले असते असें पुस्तिकेंत म्हटलें आहे. जपानची सध्याची लोकसंख्या ८ कोटी असून ह्यापेक्षा अधिक लोकसंख्येचें जपानला पोषण करतां येणार नाहीं असेंही मत व्यक्त करण्यांत आलें आहे. तथापि लोकसंख्येवर नियंत्रण ठेवण्यासंबंधीं प्रत्यक्ष उपाय मात्र सुचविण्यांत आलेले नाहींत.

**मुंबईतील गोद्यांची सुधारणा**—मुंबईतील गोद्यांची सुधारणा करण्यासाठी, त्यांची पहाणी करून अहवाल तयार करण्याचें काम एका ब्रिटिश कंपनीकडे सोंपविण्याचें हिंदुस्थान सरकारनें ठरविलें आहे. सध्या मुंबई बंदरांतील गोद्यांत क्रूझर जहाजा-सारखीं आरमारी जहाजें धक्क्याला लागूं शकत नाहींत. सिडने आणि सिंगापूर येथील गोद्या बांधणाऱ्या अलेक्झांडर गिब्स अँड को. ह्या कंपनीकडे वरील काम सोंपविण्यांत आलें आहे. विझगा-पट्टम् येथें एक नाविक तळहि बांधण्यांत यावयाचा आहे, असें समजतें.

**नारळाच्या झाडांची शिरगणती**—१९५१ सालीं हिंदुस्था-नांत होणाऱ्या मानवी शिरगणतीबरोबरच नारळांच्या झाडांचीही मोजदाद करण्यांत येणार आहे असें समजतें.

**नव्या पोस्टाच्या तिकिटांचा खप**—स्वातंत्र्य दिनाच्या दिवशीं हिंद सरकारनें काढलेल्या नव्या पोस्टाच्या तिकिटांचा ४,००,००० रुपयांचा खप झाला असें समजतें. ह्या तिकिटांवर हिंदुस्थानांतील प्राचीन इमारतींचीं अगर स्थळांचीं सुबक चित्रें छापण्यांत आलेलीं आहेत.

**अणुयुगांतील युद्धाचे नियम**—अणुयुगांतील युद्धाचे नियम काय असावे ह्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी जिनिव्हा येथें, रेड क्रॉसचे सभासद असलेल्या ६० राष्ट्रांची एक परिषद भरली होती. ही परिषद १६ आठवडे चालून अणुयुगांतील युद्धासंबंधीं नवीन नियम संमत करण्यांत आले.

**पोलिसांना नवे अधिकार**—मलायांत सध्यां कम्युनिस्ट दह-शतवाद्यांची चळवळ चालू असल्यामुळें जरूर पडल्यास पोलिसांना बँकांच्या हिशोबाचीं पुस्तकें पहाण्या-तपासण्याचा अधिकार देण्यांत आला आहे. मलायांत आणीबाणीचे जे कायदे जारी कर-ण्यांत आले आहेत त्यांचा भंग केल्याचा संशय आल्यासच हा अधिकार वापरण्यांत येणार आहे. मात्र, अधिकाराचा वापर करण्यापूर्वी मलायाच्या संघराज्याच्या मुख्य चिटणिसांची परवानगी घेण्याचें बंधन घालण्यांत आलें आहे.

**सावकारी कायद्यांत दुरुस्ती**—१९४६ सालच्या सावकारी काय-द्यांत पुन्हा दुरुस्ती करण्याचें मुंबई सरकारनें ठरविलें असून दुरुस्ती संबंधींचा मसुदा ता. ४ ऑगस्टच्या सरकारी गॅझेटांत प्रसिद्ध कर-ण्यांत आला आहे. ह्या कायद्याखालीं जे गुन्हे सांगण्यांत आले आहेत ते करणारास अधिक कडक शिक्षा ठोठावण्याचा अधिकार कोर्टांना देण्याचा बिलाचा हेतु आहे. सरकारला असें आढळून आलें आहे कीं, कांहीं सावकार कायद्याचा बुद्धिपूर्वक भंग करून आपला धंदा करीत आहेत. हल्लीं अंमलांत असलेल्या कायद्याच्या ३४ व्या कलमाप्रमाणें, ठरवून दिलेल्या दरापेक्षा अधिक दरानें व्याज घेणें हा गुन्हा ठरत नाहीं, असा निकाल एका कोर्टानें दिला आहे. म्हणून एक नवीन पोटकलम घालून अशा तऱ्हेनें जास्त व्याज घेणें हा निःसंदिग्धपणें गुन्हा ठरविण्यांत येणार आहे.

**मध्यपूर्वेतील देशांना ब्रिटन शस्त्रें पुरवणार**—जुलै, १९४८ मध्यें, पॅलेस्टाइनमधील युध्यमान राष्ट्रांना शस्त्रें पुरविण्यांत येऊं नयेत असा ठराव संयुक्त राष्ट्रसंघटनेनें केला होता. हा ठराव होण्यापूर्वी ब्रिटिश कारखान्यांकडे ज्या शस्त्रास्त्रांच्या मागण्या नोंदण्यांत आल्या होत्या, त्या आतां ब्रिटन पूर्ण करणार आहे. पॅलेस्टाइनमधील शस्त्रसंधीबाबत घातलेले निर्बंध सुरक्षा समितीनें रद्द केल्यामुळें ब्रिटननें वरील निर्णय घेतला आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेनें अधिकृत मनाई न केल्यास, इजिप्त, इराक, ट्रॅन्सजॉर्डन ह्या राष्ट्रांना शस्त्रें पुरविण्यास ब्रिटन तहांनीं बांधलें गेलें आहे.

**सिमेंटचा अद्यावत् कारखाना**—संयुक्त प्रांत सरकारनें मिर्झापूर येथें एक अद्यावत् धर्तीचा सिमेंटचा कारखाना उघडण्याचें ठरविलें आहे. कारखान्यासाठी लागणाऱ्या यंत्रसाहित्याची मागणी व्हिकर्स आर्मस्ट्रॉंग ह्या सुप्रसिद्ध कंपनीकडे नोंदविण्यांत आली आहे. ह्या यंत्रांची किंमत अंदाजे १·३३ कोटी रुपये होईल. कारखाना सुसज्ज आणि आधुनिक पद्धतीचा होईल असें म्हणतात.

**अमेरिकन ग्रंथकर्तीचा मृत्यु**—'गॉन विथ दि विंड' ह्या सुप्रसिद्ध पुस्तकाच्या लेखिका मार्गारेट मिचेल ह्यांना मोटारीचा अपघात झाला होता. अपघातांत झालेल्या जखमांमुळें त्यांचा अखेर अंत झाला. त्यांचें वरील पुस्तक १९३६ मध्यें प्रसिद्ध झालें. त्यानंतर त्या पुस्तकाच्या ४० देशांतून ८० लाख प्रती खपल्या. पुस्तकाचें भाषांतर ३० निरनिराळ्या भाषांतून झालें आहे.

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** बुधवार चौक, पुणें

# अर्थ

बुधवार, ता. २४ आगस्ट १९४९





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.

## कामगारांच्या वेतनांत वाढ

### सरासरी वार्षिक मजुरी ७३८ रुपये

हिंदुस्थानांतील कारखान्यांमधील सर्व कामगारांना ( रेल्वे वर्कशॉप्समधील कामगार वगळून ) मिळून १९४७ सालीं एकूण १३६ कोटी रुपये मजुरी मिळाली. १९४६ सालीं त्यांना १०९ कोटी रुपये मजुरी मिळाली होती. म्हणजे, मजुरीच्या रकमेंत २४·७% वाढ झाली. पेमेंट ऑफ वेजेस ॲक्ट अन्वयें कारखान्यांकडून जी आकडेवार माहिती गोळा करण्यांत येते, तिचे आधारानें वरील हिशेब करण्यांत आलेला आहे. १९४७ मध्यें कामगारांची संख्या फक्त ५% वाढली, परंतु मजुरी मात्र २४·७% वाढली. म्हणजे, वाढलेला मजुरीचा आणि महागाई भत्त्याचा दर, ह्यांचाच हा मुख्यतः परिणाम आहे.

**कामगार आणि त्यांची एकूण वार्षिक मिळकत**

| | कामावरील कामगारांची रोजची सरासरी | | मजुरीची एकूण रक्कम | | १९४६ चे मानानें १९४७ मध्यें % वाढ |
|---|---|---|---|---|---|
| प्रांत | १९४६ | १९४७ | १९४६ लक्ष रु. | १९४७ लक्ष रु. | |
| अजमीर–मारवाड | ७,६२४ | ७,९९५ | ३१ | ३१ | ०·६ |
| आसाम | ५१,५४५ | ५२ ६८८ | १०१ | १३७ | ३४·३ |
| प. बंगाल | ५,७६,१६६ | ६,१७,८४४ | २६७३ | ३३७८ | २६·४ |
| बिहार | १,२७,३१७ | १,१९,५१५ | ५९६२ | ८२९ | ३९·९ |
| मुंबई | ६,२९,०८८ | ६,३७,६३९ | ४८६६ | ५९१८ | २१·६ |
| मध्य-प्रांत वऱ्हाड | ५४,७८६ | ९४,५२८ | २६२ | ४२७ | ६२·५ |
| कूर्ग | ३१ | ४३ | ·०६ | ·१५ | १३९·९ |
| दिल्ली | ३१,११७ | २९,८४९ | २६० | २६१ | ०·४ |
| मद्रास | २,४४,४६५ | २,६०,२५२ | ८८८ | १२३४ | ३९·० |
| ओरिसा | ६,४६५ | १०,००७ | १९ | ३० | ५६·९ |
| सं. प्रांत | २,३१,४२१ | २,३३,३२१ | ११९९ | १३३४ | ११·३ |
| एकूण | १९,६०,०२५ | २०,६३,९८१ | १०९,९४ | १३५,८२ | २४·७ |

वर्षभर चालू असणाऱ्या कारखान्यांतील कामगारांना १९४६ सालीं प्रत्येक सरासरीनें ६१९ रु. मिळाले होते, ते १९४७ सालीं ७३८ रु. मिळाले. म्हणजे, दरमाणशीं वार्षिक प्राप्ती १९% वाढली.

१९३९ सालीं कामगाराची वार्षिक मिळकत १०० होती असें मानलें, तर १९४५ सालीं त्याचा इंडेक्स नंबर २०७ झाला व १९४७ मध्यें तो २७६ वर गेला. म्हणजे, मिळकत दुपटीपेक्षां अधिक झाली. मद्रास आणि ओरिसा ह्या प्रांतांत युद्धकाळापूर्वी मजुरीचे दर फार कमी होते, त्यांत युद्धकाळांत पुष्कळच वाढ झाली.

कामगारांना रुपयाच्या नोटा किती ज्यास्त मिळाल्या, ह्या प्रश्नापेक्षा त्यांच्या प्रत्यक्ष रहाणींत किती सुधारणा होऊं शकली, हा प्रश्न महत्त्वाचा आहे. रहाणीच्या खर्चाचें मान सुमारें १६% वाढून वार्षिक मिळकत १९% वाढली, ह्यावरून रहाणीच्या खर्चाचे मानापेक्षां मिळकत अधिक झाली, हें स्पष्ट होईल. मुंबई शहरांत ज्या प्रमाणांत रहाणीचा खर्च वाढत गेला, त्या प्रमाणांतच साधारणतः मजुरी वाढत गेली. परंतु मद्रास प्रांतांत मात्र मजुरीच्या रकमेनें आघाडी मारली.

**कामगारांच्या सरासरी वार्षिक मिळकतीमधील वाढीची प्रवृत्ति**

| कारखाने | १९३९ रु. | १९४३ रु. | १९४५ रु. | १९४७ रु. |
|---|---|---|---|---|
| टेक्स्टाइलस् | ... २९३ | ५७१ | ६१३ | ७७३ |
| कपास | ... ३२० | ६८३ | ७२३ | ९११ |
| ताग | ... २३० | ३५५ | ३९० | ४९७ |
| इंजिनिअरिंग | ... २६३ | ५२९ | ६५३ | ६९९ |
| खनिजें व धातू | ... ४५७ | ५०२ | ६०१ | ८९० |
| रसायनें व रंग | ... २४४ | ३९८ | ४४५ | ५९२ |
| कागद व छपाई | ... ३३२ | ४१४ | ५६८ | ७२४ |
| लाकूड, दगड व कांच | ... १९४ | ३०३ | ४१३ | ४६५ |
| कातडी | ... २८५ | ४११ | ५३६ | ६०३ |
| ऑर्डनन्स फॅक्टरी | ... ३६१ | ५२७ | ६४२ | ७५४ |
| टांकसाळी | ... ३६७ | ५७४ | ६६७ | १०७१ |
| इतर | ... २८१ | ३९२ | ५०३ | ६६३ |
| सर्व कारखाने मिळून | ... २८७ | ५२५ | ५९८ | ७३८ |

**ऑस्ट्रेलियाकडील आयात**—येत्या एक–दोन वर्षांत तरी ऑस्ट्रेलियाकडून हिंदला येणाऱ्या मालांत कपात होण्याचा संभव आहे असें समजतें. हिंदुस्थान आणि इंग्लंड ह्यांच्या दरम्यान नुकत्याच झालेल्या आर्थिक कराराप्रमाणें हिंदुस्थाननें ऑस्ट्रेलियाकडून घ्यावयाच्या मालांत कपात केली आहे, त्याचा हा परिणाम होय. ह्या मालांत फळें, लोकरीचा माल, डबाबंद मासे, शेतीचीं हत्यारें इत्यादी माल येतो. गेल्या एप्रिलमध्यें संपलेल्या १२ महिन्यांत हिंदनें ऑस्ट्रेलियाकडून २ कोटी पौंडांपेक्षां अधिक माल घेतलेला आहे.

**वाळू सांचल्यानें जमीन निकामी**—पाटणा जिल्ह्यांत सुमारें एक हजार बिघे जमीन वाळूमुळें लागवडीस आणतां न येण्यासारखी झाली आहे. बिहारमधील नद्यांना जे महापूर येतात त्यांच्यामुळें ही वाळू शेतजमिनीवर पसरते आणि ती निकामी होते.

**साखरेच्या किंमती उतरणार?**—साखरेच्या वाढत चाललेल्या किंमती कमी करण्यासाठी मध्यवर्ती सरकार उपाय योजणार आहे असें समजतें. त्याचप्रमाणें, साखरेच्या येत्या हंगामांत ऊंस आणि साखर ह्यांच्या किंमतीही कमी पातळीवर ठरविण्यांत येणार आहेत अशी वार्ता आहे.

## किमतींच्या स्थिरतेबद्दलचें व त्या उतरविण्याबद्दलचें धोरण

( भा. म. काळे. )

गेल्या वर्षी डिसेंबर महिन्यांत अर्थमंत्री डॉ. मथाई ह्यांनीं एका सुप्रसिद्ध भाषणांत सरकारचें धोरण वस्तूंचे बाजारभाव स्थिर राखण्याचें राहील असें जाहीर केलें होतें. त्यानंतरची परिस्थिति लक्षांत घेतां बाजारभावांत विशेष चढ झालेली नाहीं व साधारणपणें वस्तूंचे बाजारभाव सामान्यपणें स्थिर झाले आहेत असें दिसून येतें. गेल्या वर्षाच्या अखेर एकॉनॉमिक ॲडव्हायझरनें प्रसिद्ध केलेला जनरल इंडेक्स ३८८ होता, तो अलिकडे ३७९ आहे. मध्यंतरी तो ३७१ पर्यंत उतरला होता. अन्नविषयक वस्तूंचा गेल्या वर्षअखेरचा इंडेक्स ३९७ होता. तो हल्लीं ३९४ झाला आहे. कारखानदारी मालाचा इंडेक्स गेल्या वर्षअखेर ३४८ होता तो अलिकडे ३४३ झाला आहे. याप्रमाणें निदर्शक आंकड्यांच्या दृष्टीनें विचार केला असतां बाजारभावांची प्रवृत्ति स्थिर राहाण्याकडे दिसत आहे. परंतु अगदीं अलिकडे साखर व गोडें तेल ह्या वस्तूंचे बाजारभाव वाढत असल्याचें दिसून येतें. दुधाचाहि बाजारभाव वाढत जात आहे. सामान्य जनतेच्या दृष्टीनें वस्तूंची महर्गता अद्याप कमी होऊं लागलेली नाहीं. कोळशाचा भाव वाढलाच आहे. कापडाच्या बाबतींत मात्र पुरवठा विपुल असल्यामुळें रेशनिंगचे निर्बंध सैल केले असतां बाजारभाव उतरण्याचीं स्पष्ट चिन्हें दिसत आहेत. याचें एक निदर्शक चिन्ह म्हणजे मुंबईच्या कांहीं कापड-विक्रेत्यांनीं मालाचा उठाव करण्याच्या उद्देशानें युद्ध-पूर्व काळाप्रमाणें 'सेलस्' सुरू केले आहेत. जागतिक परिस्थिति हळू हळू किंमती उतरणें व उत्पादन वाढणें अशा स्वरूपाची होत चालली आहे. अमेरिका, जपान, कॅनडा, झेकोस्लोव्हाकिया इत्यादि देशांत उत्पादन वाढत चाललें आहे. अन्नधान्याच्या उत्पादनाची परिस्थितीहि दोन-तीन वर्षांत निश्चितपणें सुधारेल असें दिसत आहे. अमेरिकेचें कापूस व गहूं यांचें उत्पादन चालू वर्षींच वाढत आहे. कांहींच्या मतें मंदीची चिन्हें स्पष्टपणें दिसूं लागलीं आहेत.

हिंदमधील परिस्थिति विचारांत घेतली असतां पोलाद व साखर यांच्या किंमती वाढूं लागल्या आहेत, व कच्च्या मालाच्या अपुऱ्या व अविश्वसनीय पुरवठ्यामुळें ताग व कापड ह्या प्रमुख धंद्यांची स्थिति फार चिंतनीय झाली आहे. विशेषतः तागाच्या गिरण्या दरमहा कांहीं दिवस बंद ठेवाव्या लागत आहेत. कोळसा व चहाचे मळे ह्या धंद्यांतहि मजुरांचे पगार वाढल्यामुळें मालाच्या किंमती वाढण्याकडेच प्रवृत्ति आहे. हिंदसारख्या देशांत वस्तूंचे बाजारभाव प्रमुख उद्योगधंद्यांच्या उत्पादनाच्या व खर्चाच्या प्रमाणावर अवलंबून असतात. कारखान्यांत काम करणाऱ्या मजुरांचे पगार वाढूं लागले कीं त्याचा लागलीच परिणाम इतर सर्व ठिकाणच्या-शेती-सह-मजूर वर्गाच्या वेतनावर होतो. कारण, हिंदमधील कारखान्यांत काम करणारा मजूरवर्ग वारंवार आपल्या खेडेगांवांत जातो व यामुळें शहरी जीवनाचा परिणाम खेडेगांवांतील मजुरीच्या दरावर व किरकोळ बाजारभावांवर होतो.

शेतीमालाचे बाजारभाव सध्यां फार कडाडले आहेत. परंतु शेती मालाचे बाजारभाव हे परिणामीं जागतिक धान्याच्या उत्पादनावर व पुरवठ्यावर अवलंबून असतात व कांहींसे निर्गतीच्या परिस्थितीवरहि अवलंबून असतात. तांदूळ, गहूं, मका ह्या धान्यांचें जागतिक पीक सुधारूं लागलें व निर्गतीसाठी धान्याचा पुरवठा वाढूं लागला म्हणजे हिंदमधील सध्यांचे वाढलेले बाजारभाव केव्हांहि टिकूं शकणार नाहींत. हिंदला १९५१ नंतर अंतर्गत उत्पादन वाढल्यामुळें धान्याची परदेशांतून आयात करावी लागली नाहीं तरी धान्याचे बाजारभाव निश्चितपणें उतरवावे लागतील. कारण आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या सोईसाठी जागतिक पातळींत धान्यासारख्या महत्त्वाच्या वस्तूंचा बाजारभाव आणल्याशिवाय गत्यंतर नाहीं. हिंदच्या तेलबियांना कांहीं वर्षांपूर्वी युरोपकडून विशेष मागणी होती. परंतु सध्यां ब्राझील व उत्तर आफ्रिका येथें तेलबियांची लागवड होऊं लागल्यामुळें हिंदच्या मालाला गिऱ्हाईक नाहीं. तेलबियांचे बाजारभाव अद्याप वाढलेलेच आहेत ते इतर वस्तूंच्या बाजारभावामुळें. परंतु एकदां धान्य, इत्यादि पदार्थांचे बाजारभाव घटूं लागले कीं त्याचा त्वरित परिणाम तेलबियांच्या भावावरही होईल.

१९४७ व १९४८ सालामध्यें पुरवठा भरपूर असल्यामुळें व त्या मानानें उत्पादन कमी असल्यामुळें वस्तूंचे बाजारभाव वेगानें चढले. याच काळांत शेती मालाचेंहि उत्पादन घटलें व समाजांतील खालच्या वर्गाच्या हातांत पैशाचा जास्त प्रमाणांत वाटा गेल्यामुळें व ह्या वर्गाची प्रवृत्ति पैसा शिल्लक टाकण्याऐवजीं खर्च करण्याकडे असल्यामुळें मालाचे बाजारभाव वाढविण्यास मदत झाली. साखरेवरील नियंत्रण उठल्यामुळें वाढत्या किंमतींनें जास्त साखर खरेदी करण्याची प्रवृत्ति दिसून आली. किरकोळ फर्निचर, कांहीं चैनीचा माल, कापड, इत्यादि वस्तू महाग झाल्या तरी खालच्या वर्गातील लोकांच्या हातांत जास्त पैसा असल्यामुळें वस्तू खरेदी करण्याची प्रवृत्ति वाढत चालली व त्या बरोबर पुरवठा मर्यादित असल्यामुळें बाजारभाव वाढूं लागले.

अर्थशास्त्रांत वस्तूंच्या किंमती व बाजारभाव हा एक महत्त्वाचा प्रश्न समजला जातो, कारण सामान्य जनतेच्या जीवनावर त्याचा परिणाम होतो व उत्पादन आणि व्यापार व शिल्लक याहि गोष्टी पर्यायानें बाजारभावावर अवलंबून असतात. सामान्यपणें आपल्या देशांत १९२५-१९२९ ह्या काळांत ज्या पातळीवर बाजारभाव होते त्या पातळीवर ते स्थिर व्हावे असें कांहीं तज्ज्ञांचें म्हणणें होतें व सरकारी धोरणाचाहि याला पाठिंबा होता. मंदी आपल्या देशांत इतक्यांतच निर्माण होण्याची फारशी शक्यता नाहीं, परंतु जागतिक मंदी निर्माण झाल्यास तिची झळ हिंदला लागल्याशिवाय रहाणार नाहीं हें निश्चित. जागतिक मंदीचा एक वाईट परिणाम असा होतो कीं उद्योगप्रधान प्रमुख देशांनीं आपले विक्रीचे भाव उतरविले कीं मागासलेल्या देशांनाहि आपले विक्रीमालाचे बाजारभाव उतरविल्याशिवाय गत्यंतर नसतें. नेमकी हीच परिस्थिति कापड व साखर यांच्या बाबतींत प्रथम निर्माण होईल, किंबहुना तशी ती आजच निर्माण झाली आहे. आशियाच्या व आफ्रिकेच्या बाजारपेठेंत आजच हिंदचें कापड महाग समजलें जातें. आपली साखर तर इतकी महाग आहे कीं पाकिस्तानलाहि ती खरेदी करणें परवडत नाहीं. अशी परिस्थिति असल्यामुळें, उत्पादन वाढवून उत्पादनाच्या खर्चांत शक्य त्या मार्गांनीं काटकसर साधली पाहिजे व वस्तूंचे बाजारभाव उतरविण्याकडे सर्व जबाबदार लोकांची दृष्टि पाहिजे. तरच परिस्थिति आटोक्यांत येईल.

### कापडाच्या वहातुकीवरील नियंत्रणें रद्द

आतां कोणीहि मनुष्य स्वतःचें सामान म्हणून कितीहि कापड हिंदुस्थानांत कोठेंहि घेऊन जाऊं शकेल, असें हिंदुस्थान सरकारनें जाहीर केलें आहे.

## हिंदी कंपनी कायद्यांत दुरुस्ती

(बॉंबे स्टॉक एक्सचेंज (नेटिव्ह शे. अँड स्टॉ. ब्रो. अ.) नें हिंदी कंपनी कायद्यांतील दुरुस्तीसंबंधीं आपलें ६० पानी निवेदन सरकारकडे पाठविलें आहे. त्यांतील महत्त्वाचा भाग येथें दिला आहे.)

### (१) "प्रॉस्पेक्टस" आणि "निवेदन"

भाग खरेदी करणारा मनुष्य त्यास उपलब्ध करण्यांत आलेल्या माहितीच्या आधारावरच पैसे गुंतवितो. त्याची दिशाभूल होऊं नये, ह्यासाठीं प्रॉस्पेक्टस प्रसिद्ध करण्याची व त्यांत कांहीं तपशील देण्याची तरतूद कंपनी कायद्यानें केलेली आहे. परंतु, ही तरतूद कित्येक उत्पादकांना गैरसोईची वाटते आणि ते वर्तमानपत्रांत "निवेदनें" छापतात. अर्थात, पैसे गुंतविणाराला आकर्षक वाटेल एवढीच माहिती दिलेली असते. ह्या निवेदनाचा उद्देश लोकांनीं शेअर्स घ्यावे हाच असतो, परंतु त्यावरती "शेअरविक्रीची ही जाहिरात नव्हे" असें छापून कंपनी कायद्याचें बंधन पाळलें जातें. कायद्याप्रमाणें, शेअर्सच्या अर्जास प्रॉस्पेक्टस जोडावाच लागतो. परंतु हा नियम अंमलांत आणणें कठीण असतें. ह्यासाठीं, शेअर विक्रीचीं "निवेदनें" छापण्यास मनाई असावी अशी बॉंबे स्टॉक एक्सचेंजची सूचना आहे.

### (२) प्रॉस्पेक्टसमधील "तज्ज्ञां"चा रिपोर्ट

प्रॉस्पेक्टसमधील विधानांवरूनच कंपनीचे शेअर्स घेण्याजोगे आहेत किंवा नाहींत हें रक्कम गुंतविणारानें ठरवावयाचें असतें. म्हणून, प्रॉस्पेक्टसमध्यें धंद्याचा तपशीलवार पूर्वेतिहास, त्याची सद्यःस्थिति आणि पुढील अपेक्षा हीं देण्यांत आलीं पाहिजेत. तीं सर्व विश्वासार्ह तज्ज्ञांच्या सर्टिफिकेटांवर आणि रिपोर्टांवर आधारलेलीं असणें आवश्यक आहे. सबंध मेमॉरँडम ऑफ असोसिएशनचा प्रॉस्पेक्टसमध्यें समावेश करणें खरोखर निरुपयोगी आहे; कारण कंपनीचे त्यांत दिलेले उद्देश त्यांच्यांत वाटेल त्या गोष्टींचा समावेश व्हावा इतके भरमसाट असतात. पैसे गुंतवूं पहाणाऱ्यास मुख्य उद्देशाशींच कर्तव्य असतें; बाकीचे शेकडो दुय्यम उद्देश समजून घेतल्यानें त्याच्या माहितींत कोणतीच महत्त्वाची भर पडत नाहीं. अशी माहिती छापण्याऐवजीं शेअर्सविक्रीबाबत जास्त उपयुक्त माहिती देणें अधिक हितावह होईल. कंपनी कायद्यांत ह्याबाबत तरतूद आहे, ती फार अपुरी आहे. उदाहरणार्थ, प्रायव्हेट कंपनी आपल्या जिंदगीचें मूल्यमापन करून घेते आणि नंतर पब्लिक कंपनींत रूपांतर करते. परंतु, ह्या मूल्यमापनाचा तपशील प्रॉस्पेक्टसमध्यें देण्याचें तिच्यावर बंधन नाहीं, आणि प्रॉस्पेक्टसचे द्वारांच शेअरविक्री केली जाते. उत्पादक, डायरेक्टर, मॅनेजिंग एजंट, इत्यादींचे हितसंबंध स्पष्टपणें सांगितले जात नाहींत आणि "अधिक माहिती प्रत्यक्ष कराराच्या कागदांत आढळेल" असें मोघम लिहिण्यांत येतें. तज्ज्ञांच्या रिपोर्टांतील महत्त्वाचीं वाक्यें कित्येक वेळां मुद्दाम वगळण्यांत येतात; कित्येक तज्ज्ञांची लायकी व कीर्ति बेताचीच असते आणि कांहीं प्रसंगीं तर तज्ज्ञांचे रिपोर्टहि नसतात. खरेदी-विक्रीचे करार, कंपनीनें मिळविलेले लायसेन्स व सवलती, अंडररायटिंग व ब्रोकरेजचे करार, इत्यादींची तपशीलवार माहिती देण्याचें कायदेशीर रीत्या टाळलें जातें. प्रॉस्पेक्टसमध्यें सुधारणा करण्यासाठीं कायद्यांत ज्या दुरुस्त्या केल्या पाहिजेत, त्यांची यादी बॉंबे स्टॉक एक्सचेंजनें दिली आहे आणि त्यांची अंमलबजावणी कसोशीनें व्हावी, असें सुचविलें आहे. डायरेक्टर व तज्ज्ञ ह्यांच्यावर, प्रॉस्पेक्टसमधील विधानांबाबत फार मोठ्या जबाबदाऱ्या टाकण्याचें अगत्य प्रतिपादन करण्यांत आलें आहे.

### (३) आवश्यक किमान भांडवल

कोणताहि उद्योगधंदा करण्यास कांहींतरी किमान शेअर भांडवल आवश्यक असतें. त्याच्या अभावीं धंदा यशस्वी होऊं शकत नाहीं आणि जमविलेले पैसे संपले कीं धंदा बंद करावा लागतो. कांहीं किमान भांडवल जमल्याखेरीज कंपनीला व्यवहार सुरू करतांच येऊं नये, अशी अट कंपनी कायद्यानें घालून ठेवलेली आहे. परंतु, ह्या किमान भांडवलाची रक्कम ठरविण्याचें काम आर्टिकल्स ऑफ असोसिएशनवर सोपविलेलें असतें. म्हणजे, कंपनीच्या उत्पादकांच्या दृष्टीनें किती भांडवल सहज खपेल त्याचा आकडा तेथें घालण्यांत येतो; कंपनीची गरज त्यानें भागतेच, असें नाहीं. कंपनीच्या व्यवहारास लवकर प्रारंभ होणें उत्पादकांच्या व मॅनेजिंग एजंटाच्या नेहेमींच फायद्याचें असतें, मग तात्काळ पुरेसें भांडवल जमो वा न जमो. उत्पादकांना कांहीं जिंदगी कंपनीस विकण्याची असते व कंपनीचा व्यवहार सुरू झाल्याविना तिची रक्कम त्यांना मिळूं शकत नाहीं. त्याचप्रमाणें, ऑफिस अलावन्स व कमिशन ह्यासाठीं मॅनेजिंग एजंटांना वाट पहावयास नको असते. कंपनीच्या व्यवहारास प्रारंभ झाला म्हणजे पुरेसें भांडवल जमेल अशा अपेक्षेनें कित्येक वेळा काम सुरू करण्यांत येतें. कंपनीस नुकसान येऊं लागलें म्हणजे आणि मॅनेजिंग एजंटांचें किमान वेतन चालू राहिल्यामुळें शेअर घेणारांचें नुकसान होऊं लागतें. कंपनीनें व्यवहार प्रारंभ करण्यास कायद्यानें आवश्यक असणारें किमान भांवडल तिच्या व्यवहारास पुरें पडेल, अशी व्यवस्था करण्यांत आली पाहिजे. सध्या डायरेक्टरांना जी किमान भांडवलाची रक्कम ठरवावी लागते, तिचा आंकडा त्यांनीं सांगितला म्हणजे पुरें होतें. त्याऐवजी खालीलप्रमाणें व्यवस्था करण्यांत यावी, असें बॉंबे स्टॉक एक्सचेंजनें सुचविलें आहे:—

(अ) खालीलप्रमाणें तपशील देऊन, प्रत्येक बाबीसाठीं किमान किती भांडवल पाहिजे, हें डायरेक्टरांनीं स्पष्ट करावें:— (१) जमलेल्या भांडवलापैकीं किती रकमेचा विनियोग जिंदगी विकत घेण्यासाठीं केला जाईल. (२) प्राथमिक खर्च, ब्रोकरेज व अंडररायटिंग कमिशन किती देण्यांत येईल. (३) उसने घेतलेल्या पैशाच्या परतफेडीस किती रक्कम लागेल आणि (४) खेळतें भांडवल किती लागेल. (ब) वरीलपैकीं तपशीलासंबंधीं जाणूनबुजून चुकीचें विधान केलें तर तो गुन्हा समजला जाईल. (क) उत्पादक, डायरेक्टर व मॅनेजिंग एजंट ह्यांनीं जेवढे शेअर्स घेण्याचें मान्य केलें असेल त्या शेअर्सचे पोटीं अर्जाबरोबर द्यावयाचे, अलॉटमेंटचे व कॉलचे पैसे त्यांनीं भरल्याविना कमेन्समेंट सर्टिफिकेट देण्यांत येऊं नये.

(अपूर्ण)

---

### इंग्रज तज्ज्ञाचा सल्ला

हिंदी राष्ट्रीय उत्पन्नाची चौकशी करण्याचे कामीं हिंदुस्थान सरकारास सहाय्य करण्यासाठीं केंब्रिजच्या अप्लाइड एकॉनॉमिक्स खात्याचे डायरेक्टर मि. स्टोन हे हिंदुस्थानांत येणार आहेत. "राष्ट्रीय उत्पन्न" ह्या विषयाचे ते तज्ज्ञ आहेत. त्यांचें वय ३६ वर्षांचें आहे.


### 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

## परदेशाबरोबरील व्यापार

( श्री. यं. बि. ऊर्फ नानासाहेब पुराणिक, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, मुंबई,चे अध्यक्ष )

आज डॉलरचा तुटवडा व दुर्लभ चलनाची गरज आपणांला भासत आहे. तेव्हां डॉलर मिळण्याची योजना आपण आंखली पाहिजे. आज सुमारें २५ कोटी लोकांचा व्यवहार डॉलरमध्यें चालत आहे. ' स्कॅप ' व्याप्त जपानचाहि त्यांत समावेश आहे. या प्रदेशाचा परदेशी व्यापार डॉलरमध्यें चालतो.

फाळणीपूर्वी हिंदुस्थानला ज्यूटची जवळजवळ मक्तेदारी होती, व सर्व जगभर ज्यूटची निर्यात होत असे. ज्यूट, गळिताचीं धान्यें, चहा, चामडीं व कातडीं, कापूस, अभ्रक व मँगानिज ह्यांचा आपल्या निर्यात व्यापारांत फार मोठा भाग असल्यानें यांच्या देवघेवीनें आपण डॉलर कमावतों. हिंदुस्थानची फाळणी झाल्यावर परिस्थिति बदलली. कच्चा ज्यूट प्रामुख्यानें पाकिस्तानांत गेला. कापसाबाबतची परिस्थितीहि बदलली. गळिताच्या धान्यांना अर्जेंटिना व ब्राझील या देशांतून स्पर्धा सुरू झाली. इंग्लंड, आजपर्यंत हिंदुस्थानवर शेंगदाणा व अळशी यांजकरितां अवलंबून होतें तेंहि यापुढें, मोठ्या प्रमाणांतच नव्हे तर बहुशः संपूर्णपणें, या मालाची आयात आफ्रिकेंतील वसाहती व ऑस्ट्रेलिया या देशांतून करील. अशा रीतीनें दिवसेंदिवस कमी होत असलेली निर्यात सुधारावयाची असेल तर, प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रीतीनें, आपण निर्यात कशी वाढवावी, याचा विचार केला पाहिजे. आतां आपलेंच सरकार आहे. यावेळीं आपण आजवर निर्यात करीत असलेल्या वस्तू व कच्चा माल यांची अधिक प्रमाणांत कशी निर्यात करूं शकूं व हिंदी कारागिरीच्या वगैरे वस्तू कशा अधिक निर्यात करूं हें पाहिलें पाहिजे. ( अ ) म्हैसूर, त्रावणकोर, काश्मीर व जयपूर इत्यादि ठिकाणच्या चंदन, गुलाब, आक्रोड, हस्तीदंत इत्यादि कारागिरीच्या वस्तू ( ब ) जरतार व रेशीम यांचें भरतकाम ( क ) खस, गुलाबादि विख्यात उत्कृष्ट हिंदी अत्तरें ( ड ) उच्च दर्जाचीं स्वच्छतेबाबत उत्तम प्रकारची काळजी घेऊन तयार केलेलीं लोणचीं, मसाले वगैरे जिन्नस डबाबंद करून वा कांचेच्या बाटल्यांत भरून निर्यात करतां येतील. परदेशी लोकांस काय दर्जाचा, कोणत्या तऱ्हेचा माल आवडतो त्याचा अभ्यास करून तशा मालाचा पुरवठा करण्यानें निर्यात व्यापार वाढेल. अर्थात् दुर्लभ चलन अधिक प्रमाणांत हातीं येईल. इंग्लंड, अमेरिका इत्यादि पुढारलेलीं राष्ट्रें असा अभ्यास मुद्दाम करतात व त्याचा लाभ प्राप्त करून घेतात. याकरितां इतर देशांतील आपल्या हिंदच्या व्यापारी प्रतिनिधींचें सहाय्य होऊं शकेल.

### ' सह्याद्रि'चा स्वतःच्या इमारतींत गृहप्रवेश

सह्याद्रि विमा कंपनीनें नुकत्याच खरेदी घेतलेल्या बॉम्बे आग्रारोड (नाशिक) वरील इमारतींतील प्रवेश समारंभ दे. भ. बी. एस. हिरे, बी. ए., एलएल. बी., प्रेसिडेंट महाराष्ट्र प्रांतिक कॉंग्रेस कमिटी यांचे अध्यक्षतेखालीं ता. ३०–७–४९ रोजीं नागपंचमीचे सुमुहूर्तावर सकाळीं ९ वाजतां थाटानें साजरा करण्यांत आला. दुपारीं ११ वाजतां विधिपर्वक वास्तुपूजा करण्यांत येऊन उपस्थित निमंत्रितांना पानसुपारी देण्यांत आली. सदर प्रसंगीं कंपनीचे स्थानिक डायरेक्टर्स, ऑफिसमधील कार्यकर्ते व शहरांतील इतर निमंत्रित सद्गृहस्थ हजर होते.

तारीख १–८–४९ पासून कंपनीचें कामकाज स्वतःच्या नव्या इमारतींत सुरू झालें आहे.

### इनकमटॅक्स चौकशी कमिटीचा रिपोर्ट

श्री. एस्. वरदाचारियर ह्यांच्या अध्यक्षतेखाली इनकमटॅक्स चौकशीची एक कमिटी मध्यवर्ती सरकारनें नेमली होती. तिचा रिपोर्ट आतां उपलब्ध झाला आहे. त्यांत एकूण १९२ सूचनांचा अंतर्भाव झालेला आहे. त्यांतील महत्त्वाच्या अशा:–सध्याचा प्राप्तीवरील कराचा कायदा करपात्र मनुष्याची कर भरण्याची शक्ति लक्षांत घेत नाहीं. उदाहरणार्थ, अविवाहित मनुष्य आणि विवाहित मनुष्य, त्याचप्रमाणें मोठ्या कुटुंबाचा आणि लहान कुटुंबाचा मनुष्य, असा भेदाभेद कायदा करीत नाहीं. कर भरणाराची कौटुंबिक जबाबदारी लक्षांत घेऊनच कराची आकारणी होणें इष्ट ठरेल. शेतीचे उत्पन्नावर प्रांतिक सरकारें इनकमटॅक्स बसवितील, तेव्हां करपात्र माणसाचें शेतीचें व बिगर शेतीचें उत्पन्न एकत्रित करून त्यावर आकारणी करण्यांत यावी व त्याची वसुली केली जावी. मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांत उत्पन्नाची वाटणी मागाहून करणें सोईचें होईल.

अविभक्त हिंदु कुटुंबांतील लोकांना कराची आकारणी कमी व्हावी ह्यासाठीं विभक्त होण्यास लावणें गैर आहे. अविभक्त हिंदु कुटुंबांवरील इनकम टॅक्सबाबत अन्याय दूर झाला पाहिजे, ह्यासाठी, व्यक्तीच्या मानानें अविभक्त हिंदु कुटुंबास कर आकारणीच्या माफीच्या कमाल उत्पन्नाची मर्यादा निदान दुप्पट तरी असावयास पाहिजे. जेथें हिंदु अविभक्त कुटुंबांत चार किंवा चाराहून अधिक भाऊ असतील तेथें ही मर्यादा तिप्पटीइतकी असणें जरूर आहे.

### व्हल्कन विमा कंपनी लि., पुणें–शाखा

वरील कंपनीच्या पुणें शाखेनें ता० १५ ऑगस्ट १९४९ चा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहानें साजरा केला. त्याच दिवशीं पुणें येथील कंपनीच्या कार्यकर्त्यांचें छोटेसें स्नेह–सम्मेलन कंपनीच्या शाखा-कचेरींत भरविलें होतें. मुख्य पाहुणे म्हणून कंपनीच्या हेड ऑफिसचे मॅनेजर श्री. के. सी. देसाई हे सदर प्रसंगीं उपस्थित होते. मुख्य पाहुण्याशीं प्रतिनिधी मंडळींचा परिचय करून दिल्यावर शाखाधिकारी श्री. हरिभाऊ जोशी यांनीं शाखा स्थापन केल्यापासून शाखेनें आजपर्यंत केलेल्या प्रगतीचा थोडक्यांत आढावा घेतला व शाखेला गेल्या दहा वर्षांत विमेदार व प्रतिनिधी यांनीं भरपूर पाठिंबा दिल्याबद्दल त्यांचे आभार मानले. उत्तरादाखल केलेल्या भाषणांत श्री. देसाई यांनीं शाखेच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केलें व " पुण्याची शाखा " सर्व शाखांमध्यें प्रमुख असल्याचा निर्वाळा दिला, व यापुढील कालांतही अशीच प्रगति करण्याबद्दल एजंट मंडळींना विनंती केली. शाखेचे आद्य संस्थापक मे. के. बी. जोशी ॲण्ड सन्स, शाखाधिकारी श्री. हरिभाऊ जोशी यांच्या अविश्रांत श्रमाबद्दल गौरव करून त्यांनीं जमलेल्या सर्व मंडळींचे आभार मानले. शेवटीं पानसुपारी व चहापान झाल्यावर हा गोड समारंभ संपला.

**मध्यभारतांतील यांत्रिक शेती**—मध्यवर्ती सरकारच्या यांत्रिक नांगरांच्या संघटनेकडून मध्यभारत सरकारला ९० यांत्रिक नांगर मिळाले आहेत. ह्या नांगरांचा उपयोग करून १,००,००० एकर पडीक जमीन प्रथमच लागवडीखालीं आणली जाणार आहे. ह्या नव्या जमिनींत १,७०० टन अन्नधान्य निर्माण होईल असा अंदाज आहे. हिंदुस्थानांतील २,४०,००० एकर जमिनींत तण उगवलेले आहेत. ही सर्व जमीन ५ वर्षांत लागवडीस आणण्याची सरकारची योजना आहे. मध्यभारतांतील शेतीसाठीं देण्यांत आलेले नांगर वरील योजनाचाच एक भाग आहे.

### अन्नधान्याच्या आघाडीवर फोर्ड कंपनीचें सहकार्य

हिंदुस्थानांतील अन्नधान्याच्या निर्मितीचा प्रश्न युद्धकालीन तांतडीच्या जाणीवेनें सोडवला पाहिजे अशी भाषा अलीकडे वापरण्यांत येऊं लागली आहे तीवरून ह्या प्रश्नाचें महत्त्व आधिकच स्पष्ट होते. हिंदुस्थान सरकारनें श्री. आर. के. पाटील ह्यांची फूड कमिशनर म्हणून मुद्दाम नेमणूक केलेलीच आहे. सरकारी प्रयत्नाबरोबरच अन्नधान्याच्या निर्मितीशीं कमी-अधिक संबंध येणाऱ्या कंपन्यांनींही आपल्या प्रयत्नांची शिकस्त केली पाहिजे. हिंदमधील फोर्ड मोटार कंपनीनें ह्या कामीं कंबर कसली आहे. यांत्रिक नांगर तयार करणाऱ्या ह्या कंपनीच्या इंग्लंडमधील एका अधिकाऱ्यानें, इंग्लंडनें युद्धकालांत अन्नधान्याचें उत्पादन वाढविण्यासाठी कशी कसून खटपट केली त्याची माहिती सांगितली आहे. युद्धकालांत इंग्लंडच्या नागरिकांवर उपासमार होण्याचा प्रसंग येऊं घातला होता. परंतु यांत्रिक नांगरांच्या साह्यानें अन्नधान्याचें उत्पादन झपाट्यानें वाढविण्यांत आले. सप्टेंबर १९३९ पासून ते युरोपांतील युद्धांत जय होईपर्यंत इंग्लंडनें फोर्ड कंपनीचे १,३६,८११ यांत्रिक नांगर शेतीसाठी उपयोगी आणले. १९४० ते १९४५ ह्या वर्षांत ब्रिटिश शेतकऱ्यांनी आपलीं पिकें २,०७,६७,००० टनांनीं वाढविली. इंग्लंडमध्यें जितके यांत्रिक नांगर उपयोगांत आणण्यांत आले त्यांपैकीं ९४ टक्के फोर्ड कंपनीनें तयार केलेले होते. हिंदुस्थानांतील शेतीचें उत्पादन वाढविण्यासाठी यांत्रिक नांगरांची अत्यंत आवश्यकता असून त्यांचा तुटवडा अजूनही भासत आहे. ही उणीव भरून काढण्याच्या दृष्टीनें फोर्ड इंडिआ कंपनीनें मुंबई, कलकत्ता आणि मद्रास ह्या ठिकाणीं यांत्रिक नांगर, त्यांचे सुटे भाग आणि इतर अवजारें भरपूर प्रमाणांत मिळण्याची व्यवस्था केली आहे. शेतीच्या ह्या यंत्रसामग्रीचा वापर कसा करावा हें शिकविण्याची सोयही कंपनीनें केली आहे. १९४०–४५ सालांत कंपनीनें ८,८०० माणसें शिकवून तयार केलीं. १९४६ सालीं आणखी ६०० माणसें शिकून तयार झालीं. हिंदमधील फोर्डमोटार कंपनीचे मॅनेजर मि. स्टीव्हन्सन ह्यांनीं हिंदुस्थानला अन्नधान्याच्या बाबतींत स्वयंपूर्ण करण्याच्या दृष्टीनें सहकार्य करण्याचें आश्वासन दिलेलें आहे.

**अणुशक्तीचा औद्योगिक उपयोग**—अणुशक्तीचा औद्योगिक उपयोग करण्यासंबंधींची एक दीर्घकालीन योजना ऑस्ट्रेलिआचे युद्धोत्तर पुनर्घटना खात्याचे मंत्री मध्यवर्ती सरकारला सादर करणार आहेत. ह्या योजनेचा ऊणुबॉंबच्या उत्पादनाशीं कांहीं संबंध नाहीं; कारण अशा उत्पादनाला लागणारें सामर्थ्य ऑस्ट्रेलिआजवळ नाहीं असेंही त्यांनीं सांगितलें. ऑस्ट्रेलिआंत, फक्त दक्षिण ऑस्ट्रेलिआंतच युरेनिअम हें अणुशक्तीला लागणारे खनिज सांपडतें.

**जपानमधील जमीन धारणेबाबत सुधारणा**—जपानमधील जमीन धारणेच्या व्यवस्थेंत सुधारणा घडवून आणण्यासाठीं ११३२ स्थानिक कमिशन्सची निवडणूक होणार आहे. ह्या निवडणुकींत २ कोटी जपानी शेतकरी मतदान करणार आहेत.

**हिंदी बोलपटाचा धंदा**—मोशन पिक्चर सोसायटी ऑफ इंडिआचे अध्यक्ष श्री. चुनीलाल ह्यांनीं लंडनमध्यें बोलतांना हिंदी बोलपटाच्या धंद्याला हिंद सरकार मदत करीत नाहीं अशी तक्रार केली. ह्या धंद्याला बँकाही मदत करीत नाहींत असें सांगून ते पुढें म्हणाले कीं हिंदुस्थानांतील सेन्सॉरशिपमुळें लोकांना आवडतील असे चित्रपट काढणें अवघड होत चाललें आहे. हिंदी बोलपटाच्या धंद्याबाबत सरकार जी चौकशी करणार आहे त्याबद्दल श्री. चुनीलाल ह्यांनीं समाधान व्यक्त केलें.


# बँक ऑफ पूना, लिमिटेड.

(शेड्यूल्ड बँक)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | रु. २५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. १२,५०,००० |

मध्यम वर्गीयांना मासिक उत्पन्नांतून एका रकमेनें मुलांच्या शिक्षणाचा खर्च भागवत नाहीं. दरमहा ५ रु. नियमित शिल्लक टाकल्यास पांच वर्षांत ३०० रुपये स्वतःचे होतात. अशा बचत योजनेच्या रकमेवर ३ टक्क्यापर्यंत व्याज मिळण्याची सोय.

**बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.**

जास्त माहितीसाठी मुख्य कचेरीस अगर शाखांस लिहा.

मुख्य कचेरी:–४५५ रविवार पेठ, पुणें नं. २

स्थानिक शाखाः–(१) भवानी पेठ. (२) सदाशिव पेठ.

बाहेर गांवच्या शाखाः–(१) टिळक चौक, सोलापूर, (२) वखार भाग, सांगली.

# दि सांगली स्टेट सेंट्रल को–ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली

(स्थापना सन १९२७)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ५,००,००० रु. |
| खपलेलें भांडवल | १,७६,१०० रु. |
| भरलेलें भांडवल | १,०३,२५० रु. |
| रिझर्व्ह व इतर फंड | १,१७,००० रु. |
| खेळतें भांडवल | ११,००,००० रु. |

या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग व करंट ठेवी स्वीकारल्या जातात. बँकेचे सभासदांना, सोसायट्यांना व व्यक्तिशः भागीदारांना योग्य तारणावर कर्जे दिलीं जातात. सोन्याचे तारणावर सवलतीचे व्याजाचे दरानें कर्ज दिलें जातें. वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि. सातारा व इंडिया इक्विटेबल इं. कं. लि. कलकत्ता, या कंपन्यांचे विम्यांचे हप्ते स्वीकारले जातात. चेक–हुंड्यांची खरेदी-विक्री, सरकारी कर्जरोखे व शेअर्स यांची खरेदी-विकी व व्याज-वसुली वगैरे

**सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.**

ना. पां. ठाणेदार
मॅनेजर

## हिंद–ब्रिटन व्यापार

इंग्लंड–हिंदुस्थान व्यापाराचा १९४८ च्या पहिल्या सहामाहीचा आढावा प्रसिद्ध झाला आहे. इंग्लंडनें सर्व देशांकडे मिळून जेवढी यंत्रसामुग्री धाडली तिच्या १५% हिंदुस्थानाकडे आली. इंग्लंडनें हिंदुस्थानकडे एकूण २ कोटी पौंड किंमतीची यंत्रसामुग्री पाठविली. १९४८ च्या पहिल्या सहामाहींतील निर्गतीच्या किंमतीपेक्षा ही किंमत ५० लक्ष पौंडांनीं ज्यास्त आहे. यंत्रसामुग्रींत मुख्य भरणा कापड गिरण्यांना लागणाऱ्या यंत्रसामुग्रीचाच होता. हिंदुस्थानकडून इंग्लंडनें जो माल घेतला त्यांत चहा सर्वात अधिक महत्त्वाचा होता. इंग्लंडच्या हिंदुस्थानकडील आयातीपैकीं ४१% आयात चहाची झाली व त्याची किंमत २ कोटी रुपये भरली.

### हिंद–ब्रिटन व्यापाराचे तुलनात्मक आकडे

( आकडे हजार पौंडाचे )

| | १९४८ | १९४८ | १९४९ |
|---|---|---|---|
| आयात : प्रमुख बाबी | संबंध वर्ष | जाने–जून | जाने–जून |
| सर्व निर्गतीची बेरीज | ९६,६२१ | ३८,७०८ | ७२,९७२ |
| पैकी | | | |
| मशिनरी | ३४,०७९ | १६,०८३ | २०,९०८ |
| वहानें | १२,८२७ | ४,८७९ | ९,५९२ |
| लोखंड, पोलाद व त्याचा माल | ४,२३५ | १,९४८ | २,६९१ |
| वीज साहित्य | ६,५७२ | २,७६४ | ७,८१६ |
| रसायनें, औषधें, रंग इ. | ९,०५७ | २,९२३ | ७,२३२ |
| निर्गत : प्रमुख बाबी पैकी | | | |
| चहा | ३५,१४८ | १५,१७१ | १८,९१८ |
| तंबाखू | २,९५६ | ६१७ | २,०६६ |
| कच्चा ताग | ५,९५५ | ४,४९९ | ३,५२ |
| गळिताचीं धान्यें, तेलें, रेझीन्स, इ. | ९,६३९ | ७,५४९ | २,४९९ |
| कच्चीं कातडीं | १,११७ | ३४१ | ९४७ |
| तागाचा पक्का माल | १५,८४६ | ७,०३९ | ५,०८१ |
| कातडी माल | ७,२२८ | ३,२४४ | ४,८२६ |

### हिंदुस्थानास साडेतीन कोटी डॉलर कर्ज मिळालें

इंटरनॅशनल बँकेनें हिंदुस्थानास १५ वर्षें मुदतीचें ३ कोटी ४० लक्ष डॉलर इतकें कर्ज ता. १७ रोजीं मंजूर केलें. कर्जफेडीची मुदत १५ वर्षें असून व्याजाचा दर ३% असून कमिशन १% आहे. १५ ऑगस्ट १९५० पासून परतफेडीचे पोटीं हप्ते सुरू होतील. इंजनें, बॉयलर्स, सुटे भाग, इत्यादि रेल्वे साहित्याच्या खरेदीकडे कर्जाचा विनियोग करण्यांत यावयाचा आहे. एकूण ७ कोटी, ५० लक्ष डॉलर्सपर्यंत बँकेकडून कर्ज मिळण्याची अपेक्षा आहे. बँकेच्या आशिया खंडांतील सभासदास बँकेकडून कर्ज मिळल्याचें हें पहिलेंच उदाहरण आहे.

### राष्ट्रीय उत्पन्नाची चौकशी

हिंदी राष्ट्रीय उत्पन्नाबाबत चौकशी करण्यासाठी हिंदुस्थान सरकारनें एक कमिटी नेमली आहे. ती आपल्या कामांत तीन विदेशी तज्ज्ञांचा सल्ला घेईल. १८ महिन्यांत कमिटीचा अहवाल पुरा व्हावा, अशी अपेक्षा आहे.


**धी कोपरगांव पीपल्स को. ऑ. बँक लि.**

कोपरगांव, जि. अहमदनगर.

( उद्घाटन समारंभ : ता. १७–१–१९४९ )

कोपरगांव येथील अत्यंत प्रतिष्ठित नागरिक यांचे देखरेखीखालीं स्थापित झालेली आणि आधुनिक पद्धतींवर बँकिंगचे सर्व व्यवहार करणारी

**स्थानिक सहकारी बँक**

सुरुवातीचें शेअर भांडवल : ६८,७५० रु.

बिलें वसुली, हुंड्या, मुंबईवरील चेक्स, ड्राफ्टस, वगैरे व्यवहार केले जातात.

आकर्षक व्याजावर मुदतीच्या ठेवी ३ महिनेपासून ५ वर्षेंपर्यंत स्वीकारल्या जातील.

सेव्हिंग्ज बँकेंत रु. १०,००० पर्यंत व्याज देणेंत येतें.

**विशेष माहितीसाठी लिहा अगर भेटा.**

जी. पी. ठाणेकर बी. ए. मॅनेजर. | मोहनलाल कालिदास व्यास चेअरमन.



**दि सेन्ट्रल म्युच्युअल विमा कंपनी, लिमिटेड**

हेड ऑफिसः—लालगीर चेंबर्स, फोर्ट, मुंबई.

★ नव्या कामाचे मोठे आकडे हेंच केवळ विमा कंपनीच्या यशाचें खरें गमक नव्हे. विमेदारांची योग्य निवड, काटकसरीची शास्त्रशुद्ध पण चोख व्यवस्था याचीच या धंद्यास खरी जरूरी आहे. आमचा कारभार वरील तत्त्वानुसारच चालतो, याची आजच खात्री करून घ्या.

शं. न. आगाशे
मॅनेजिंग डायरेक्टर.



**दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.**

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.



बेडेकर
लोणच्याचा
तयार मसाला


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.